पूर्वा कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन... मासिक

संस्थापक संपादक
डॉ. बी.बी. पवार

संपादक
डॉ. भास्कर गायकवाड

संपादन सहयोग
पराग वाड

चित्रांकन आणि मांडणी
कैलास भामरे

व्यवस्थापक - लेखा विभाग
राजेंद्र बागुल

सहकार्य
विजय पवार
संचालक, पूर्वा ॲग्रोटेक

सुहास कदम
संचालक, पूर्वा ॲग्रो मार्केटिंग

महेश पाटील
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

विजय नाईकरे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, पुणे

सचिन दिघे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, संगमनेर

रईस इनामदार
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, कोपरगाव

नंदकिशोर चतरकर
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, विदर्भ

संजय पाटील
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, मराठवाडा

पूर्वा केमटेक प्रा.लि.,
एम ११३, एमआयडीसी अंबड,
नाशिक-४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

## संपादकीय

# कृषिविकासात पशुधनाचे मोलाचे योगदान



डॉ. भास्कर गायकवाड
(संपादक : 'पूर्वा कृषिदूत')
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

- दुग्ध व्यवसाय हा शेतकऱ्यांचा सर्वात किफायतशीर जोडधंदा
- पशुसंवर्धन असणाऱ्या क्षेत्रात दारिद्र्य तुलनेने कमी
- कृषिक्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुपालनाचा लक्षणीय वाटा
- दुग्धनिर्मिती व्यवसायाला वित्तीय पाठबळाची मात्र गरज
- देशांतर्गत दुग्धउत्पादन तसेच निर्यातवृद्धीसाठीही नियोजन हवे
- पशुधनाला विम्याचे सर्वतोपरी संरक्षणही गरजेचे

शेती व्यवसाय अनेक कारणांमुळे अशाश्वत असतो. निसर्गातील बदल, बाजारभावातील चढउतार, शेतीला आवश्यक असलेल्या बाबी विशेषतः पाणी, वीज, शेतीकर्ज, जमिनीचे आरोग्य, बियाणे- खते यांची उपलब्धता आणि त्यांची कमअस्सल गुणप्रत यामुळे अनेकदा शेतकरी अडचणीत सापडतो. एकाच प्रकारचे पीक घेताना शेतकऱ्यांना आलेल्या अडचणींतून बाहेर पडता येत नाही. आर्थिक संकटामध्ये सापडून नंतर त्यांची आणि त्यांच्या शेतीची वाताहत होते. विशेषतः हरितक्रांतीनंतर जास्त खर्चाच्या, प्रत्येक बाबतीत परावलंबी आणि एकपीक पध्दतीच्या शेतीने शेतकऱ्यांचे जीवन अधिकच अशाश्वत केले आहे. एकपीक पध्दतीमुळे त्या पिकाचे नुकसान झाले किंवा बाजारभाव गडगडले तर शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करण्याशिवाय त्याला पर्याय नसतो. तसेच एकात्मिक शेतीचा ज्या भागामध्ये अभाव आहे, जे शेतकरी केवळ हंगामी पिकांवरच अवलंबून आहेत त्यांचेही जीवन अशाश्वत बनते. अर्थात आजही अनेक भागांमध्ये शेतकरी शाश्वत जीवन जगतो. त्यासाठी तो विविध पीकपध्दती किंवा शेतीला जोडधंद्यांचा आधार देऊन स्वतःचा व्यवसाय शाश्वत करतो.

### भूमाता आणि गोमाता यांचे अतूट नाते

शेतीच्या अनेक जोडधंद्यांपैकी सर्वात जुना आणि शाश्वत जोडधंदा म्हणजे पशुसंवर्धन. आपल्या पूर्वजांपासूनचा हा पारंपरिक व्यवसाय. भूमाता आणि गोमातेचे संवर्धन करणाऱ्या भूमिपुत्राला त्यांनी कधीही अडचणीत आणले नाही. शेतकऱ्याची या एकत्रित

व्यवसायामुळे भरभराटच झालेली आहे. परंतु भौतिक प्रगतीच्या नावाखाली भूमिपुत्राने भूमातेच्या आरोग्याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे तिनेही उत्पादन कमी देण्यास सुरुवात केली. तसेच अनेक भूमिपुत्रांनी तर गोमातेला शेतीच्या बाहेरचा रस्ता दाखविला. दारासमोरची लक्ष्मी गेल्यामुळे शेतकऱ्यांच्या घरातील संपत्तीलाही ओहोटी लागली. याचा परिणाम म्हणजे शेतकरी आर्थिक संकटात येत आहे. गोमाता आणि भूमाता या खऱ्या शेतकऱ्यांच्या दोन्ही माता, दोघी सख्ख्या बहिणी. त्या एकमेकींशिवाय राहूच शकत नाहीत. निसर्गाने त्यांना एका चांगल्या चक्रामध्ये बसविलेले असूनही आपण मात्र त्यांची ताटातूट करतो. भूमाता गोमातेच्या पोषणासाठी चारा तयार करते तर गोमाता भूमातेच्या पोषणासाठी शेण-गोमूत्रासारखे अत्यंत उपयुक्त खाद्य तयार करून खाऊ घालते. हेच खरे निसर्गचक्र. हीच खरी निसर्गाची किमया. मात्र विज्ञानाच्या अधिक प्रमाणात आहारी जाऊन पूर्वापार ज्ञान आणि संस्कृतीला मूठमाती देणाऱ्या विचारसरणीमुळे आज या पध्दतीला तिलांजली देऊन शेतकरी बंधू आपलीच वाताहत करत आहेत.

## दुग्ध व्यवसाय म्हणजे सदैव चलनी नाणे!

दुग्ध व्यवसाय तसेच पशुसंवर्धन म्हणजे शेतकऱ्यांचे एटीएम! जेव्हा पाहिजे तेव्हा पैशाची उपलब्धता. शेतकरी म्हणतात की दुधाचा पैसा सतत चलनात राहतो, त्यामुळे दैनंदिन व्यवहार किंवा दैनंदिन गरजा पूर्ण करण्याचे काम दुधाच्या पैशांवरच होते. त्यामुळे आजही मोठ्या प्रमाणात अल्प व अत्यल्पभूधारक तसेच जिरायत भागातील शेतकरी या व्यवसायामुळे स्थिर आहेत. देशातील एकूण रोजगारापैकी ८ ते ९ टक्के रोजगार निर्मिती या व्यवसायातून होत असते. विशेषतः घरच्या घरी काम करता येते म्हणून महिलांचा या व्यवसायामध्ये ८५ ते ९० टक्के वाटा आहे. देशातील ६५ टक्के शेतकरी कुटुंबांकडे हा व्यवसाय आहे. अनेकदा हवामानातील बदलांमुळे पीक वाया गेले किंवा बाजारभावातील चढ-उतारामुळे शेतीमध्ये नुकसान झाले तरीही ज्या शेतकऱ्याकडे दुग्ध व्यवसाय आहे त्यांना त्याचा फार मोठा फरक पडत नाही. दुग्ध व्यवसाय अशा शेतकऱ्यांसाठी विम्याच्या कवच- कुंडलांसारखे काम करतो. परंतु ज्यांच्याकडे दुग्ध व्यवसाय नाही त्यांच्यावर मात्र कर्जबाजारी होण्याची वेळ येते. म्हणजेच दुग्ध व्यवसाय शेतकऱ्यांना आधार देणारा एक मोठा व्यवसाय आहे. ज्या भागामध्ये दुग्ध व्यवसाय आणि पशुसंवर्धन आहे त्या भागातील गरिबीचे प्रमाण कमी दिसून आल्याचा एका सर्व्हेचा रिपोर्ट आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर पश्चिम महाराष्ट्र तसा दगड-धोंड्यांचा, डोंगराळ प्रदेश. जमिनी कमी प्रतीच्या आणि पाऊसमानही कमी. परंतु एकात्मिक शेती पध्दती विशेषतः दुग्ध व्यवसायाशी संलग्न केल्यामुळे विकास झाला. या प्रकारचा विकास राज्यातील इतर प्रदेशांत झाला नाही, कारण एकपीक पध्दतीचा अवलंब आणि एकत्रित शेती पध्दतीचा अभाव. यापुढील काळात हवामानामध्ये बदल होत असताना दुग्ध व्यवसायासारखे शाश्वत उत्पादन देणाऱ्या व्यवसायांची शेतकऱ्यांना गरज आहे; तरच ते शाश्वत आणि कर्जमुक्त जीवन जगू शकतील.

## दुग्ध व्यवसायाची दशा आणि दिशा

देशातील दुग्ध व्यवसायाचा खरा आधारस्तंभ म्हणजे म्हशी आणि गाई. उत्तर भारतात म्हशी तर दक्षिण भारतात गाईंचा उपयोग दुग्ध व्यवसायासाठी केला जातो. जगातील ५७ टक्के म्हशी तर १६ टक्के गाई भारतामध्ये आहेत. परंतु जगाच्या एकूण दूध उत्पादनाच्या केवळ १४ टक्के दूध उत्पादन भारतात होते. देशभरात शेतीच्या एकूण उत्पादनापैकी २५ टक्के उत्पादन पशुसंवर्धनातून मिळते. महाराष्ट्रातील एकूण शेती उत्पादनापैकी १८ ते १९ टक्के उत्पादन पशुसंवर्धनातून मिळते. अर्थात एवढे उत्पादन घेण्यासाठी फक्त २ ते ३ टक्के जमीन या क्षेत्राखाली गुंतविली आहे. याउलट राज्यातील ६० टक्के शेतामध्ये अन्नधान्याची पिके घेतली जातात आणि त्याचा राज्यातील शेती उत्पादनातील वाटा मात्र फक्त २५ टक्केच आहे. यावरून लक्षात येते की कमी जमीनधारणेमध्ये जास्त उत्पादन देण्याची क्षमता दुग्ध व्यवसायात आहे. आज देशपातळीवर विचार केला तर अन्नधान्याच्या एकूण उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न पशुसंवर्धनातून मिळते. दुग्ध व्यवसायाच्या एकूण उत्पादन वाढीचा विचार केला तर दरवर्षी या व्यवसायामध्ये ४ ते ५ टक्के वाढ होते. म्हणजेच कृषिक्षेत्राच्या वार्षिक उत्पादन वाढीमध्ये या व्यवसायाचा महत्त्वाचा वाटा आहे. आज भारत दुग्ध व्यवसायामध्ये जनावरांच्या संख्येमध्ये अव्वलस्थानी असूनही एकूण उत्पादनाच्या केवळ ०.२ टक्के निर्यात होते. अर्थात आजही देशांतर्गत गरज लक्षात घेता आपण आपल्या समाजाला पाहिजे त्या प्रमाणात दुधाचा पुरवठा करत नाही. मागील ६० वर्षांमध्ये दुधाचे उत्पादन २० दशलक्ष टनांवरून १०० दशलक्ष टनांपर्यंत वाढलेले असले तरी हे उत्पादन १३० ते १४० दशलक्ष टनांपर्यंत वाढविण्याची गरज आहे, त्यामुळे हा व्यवसाय वाढविण्यासाठी मोठी संधी आहे.

## दूध हे सर्वार्थाने पूर्णान्न

दुधाला पूर्णान्न म्हटले जाते. दुधापासून प्रथिने, जैविके, प्रतिजैविके, खनिजे, सूक्ष्म अन्नद्रव्ये, उष्मांक सर्वात जास्त मिळतात आणि इतर अन्नापेक्षा ते स्वस्तही आहे. दुधात जैविक गुणधर्म जास्त असल्यामुळे ते पचनाला सुलभ आणि चांगले आहे. त्यामुळे चांगल्या दुधाचा वापर करून आपली लहान मुले आणि तरुण पिढी निरोगी तयार केली तर ते सक्षम आणि सशक्त देश घडवू शकतात. यादृष्टीने दुधाचा वापर वाढविणे ही खरी देश घडविण्यासाठीची मोठी गुंतवणूक ठरणार आहे. अनेकदा दुधाचा पुरवठा कमी आणि मागणीत वाढ झाली म्हणजे मग त्यामध्ये भेसळ सुरु होते. सणाच्या दिवसांत तर भेसळ जास्त वाढते. दुधाचे भाव वाढले म्हणजे दुधाची पावडर आयात केली जाते. खरं तर हे दुष्टचक्र थांबविणे गरजेचे आहे. शुध्द दूधनिर्मिती करून त्याचा वापर केला तरच आपली पुढील पिढी निरोगी आणि कार्यक्षम तयार होईल. परंतु या सर्व बाबींची जाणीव आजही नियोजनामध्ये दिसून येत नाही. वार्षिक अंदाजपत्रक मग ते देशाचे असो की राज्याचे त्यामध्ये पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसायाला फारच नगण्य आर्थिक उपलब्धी करून दिली जाते. देशातील कृषी क्षेत्रातील एकूण उत्पादनाच्या २५ ते २६ टक्के वाटा असलेल्या या क्षेत्राला कृषी क्षेत्राच्या एकूण बजेटपैकी फक्त ११ ते १२ टक्के वाटा मिळतो. आजही देशपातळीपासून ते गावपातळीपर्यंत अनेक योजना, अनुदान, कार्य करणारे विभागीय कर्मचारी यांचे प्रमाण पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसायासाठी कमीच आहे. देशातील ६५ टक्के शेतकरी केवळ या व्यवसायावरच अवलंबून असूनही फक्त ५ टक्के शेतकरी कुटुंबांपर्यंत या व्यवसायाच्या नवनवीन योजनांची माहिती पोहोचते. आजही या व्यवसायामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब अत्यंत कमी प्रमाणात केला जातो. कारण या क्षेत्रात तंत्रज्ञान निर्मिती आणि प्रसाराचे कार्य कमी चालते. या व्यवसायातील चांगले उत्पादन देणारे १८ ते १९ टक्के पशुधन विविध रोगांना बळी पडत असताना या पशुधनाला विम्याचे संरक्षण फारच कमी आहे. दुग्ध व्यावसायिकांना सेवा सुविधा देण्यासाठी २,५९,००० कर्मचारी- गोधन सेवकांची गरज असताना फक्त ५२,००० कर्मचारी सेवा देतात.

## दुग्ध क्षेत्राला पुरेसे वित्तसाह्य हवे

शेतीसाठी १८ टक्के पीककर्ज देणे विविध बँकांना बंधनकारक केलेले असताना; दुग्ध व्यवसायासाठी फक्त ४ ते ५ टक्केच कर्जपुरवठा करण्यात येतो. पीककर्ज घेतल्यानंतर त्यावर व्याजदरात सूट किंवा बिनव्याजी कर्ज असते. परंतु दुग्ध व्यवसायासाठी व्याजदरामध्ये अशी सूट शेतकऱ्यांना मिळत नाही. पिकांच्या चांगल्या बीजोत्पादनात संकरित वाणांची निर्मिती होत असते. यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणि स्पर्धा चालते. परंतु दुग्ध व्यवसायासाठी चांगल्या जाती, त्यांचा चांगला वीर्यपुरवठा तसेच गुणनियंत्रणाबाबत मात्र उदासीनता दिसते. या व्यवसायासाठीच्या चांगल्या योजना, नियोजन आणि अंमलबजावणीचा अभाव यामुळे जगाच्या सरासरी उत्पादन पातळीच्या केवळ २० ते ३० टक्क्यांपर्यंत आपला देश पोहोचू शकलेला आहे. चांगल्या प्रकारचे खाद्य, चारा पिकांचा प्रसार, ब्रीडिंग- फीडिंग पॉलिसीचा प्रत्यक्ष अवलंब, रोग- आजारांचे व्यवस्थापन आणि त्यांच्या नियंत्रणासाठीची योग्य कार्यवाही या सर्व बाबी झाल्या तरच हा व्यवसाय भारतीय शेतकऱ्यांसाठी सर्वांत मोठा आधारस्तंभ होणार आहे. कमी होत असलेली जमीनधारणा, पाण्याची टंचाई, हवामानात होत असलेले बदल, वाढत चाललेली बेरोजगारी या सर्व बाबींचा विचार केला तर; पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय अल्प व अत्यल्पभूधारक शेतकरी, विशेषतः जिरायत भागातील शेतकरी तसेच तरुण बेरोजगार युवकांसाठी मोठा आधारस्तंभ नव्हे तर प्रगतीकडे घेऊन जाणारा राजमार्ग होणार आहे. यासाठी सर्वांच्या सांघिक प्रयत्नांची आणि नवीन तंत्रज्ञान पध्दतीची गरज आहे. ■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक **संजय भास्कर पवार** यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३ येथे प्रकाशित केले.

संपादक : **डॉ. भास्कर गायकवाड.**

* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.